An International Multidisciplinary
Quarterly Research Journal

ISO 9001:2008 QMS
ISBN / ISSN

# AJANTA

Volume - IX, Issue - I, January - March - 2020
ISSN - 2277 - 5730
Impact Factor - 6.399 (www.sjifactor.com)

Is Hereby Awarding This Certificate To

[illegible]

In Recognition of the Publication of the Paper Entitled

राष्ट्रसंतांचे युवकांना आवाहन

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Ajanta Prakashan, Jaisingpura, Near University Gate, Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 8390984760 Tel. No.: (0240) 2400877,
ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com

Editor : Vinay S. Hatole

Adarsh Arts & Commerce College, Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist- Gadchiroli

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Volume - IX, Issue - I,
January - March – 2020
Marathi Part - IV

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com

An International
Multidisciplinary
Quarterly
Research Journal

# AJANTA






Ajanta Prakashan

PRINCIPAL

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - IV



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| २७ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे स्त्री विषयक विचार<br>प्रा. आर. आर. पाटील | ११२-११५ |
| २८ | ग्राम स्वच्छता व रामधून एक ग्राम जागृतीची चळवळ<br>श्री. आर. एच. खंदारे | ११६-११८ |
| २९ | राष्ट्रसंत पृथकता आणि विशेषता<br>प्रा. डॉ. आनंद वसंत डुडूल | ११९-१२५ |
| ३० | राष्ट्रसंतांचे वैचारिक विश्व<br>डॉ. अनमोल शेंडे | १२६-१३० |
| ३१ | राष्ट्रसंताचे ग्रामिण विकासाबाबत विचार<br>प्रा. डॉ. संतोष सदाशिवराव मिसाळ | १३१-१३३ |
| ३२ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची ग्रामस्वराज्य संकल्पना<br>रविंद्र चांगोजी मोहतुरे | १३४-१३७ |
| ३३ | वंदनीय राष्ट्रसंतांचा संगीत विषयक दृष्टिकोन<br>सतिश दगडूजी जमधाडे | १३८-१४० |
| ३४ | राष्ट्रसंतांचे युवकांना आवाहन<br>प्रा. डॉ. हरिश्चंद्र माधवराव कामडी | १४१-१४४ |
| ३५ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे संगीतमय भजनांद्वारे समाज प्रबोधन<br>प्रा. डॉ. सचिन सुरेशराव बंडगर | १४५-१४८ |
| ३६ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे सांगीतिक प्रयोग<br>प्रा. संतोष ना. वावगे | १४९-१५० |
| ३७ | तुकडोजींच्या खंजेरी निनादातुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा गुणगौरव<br>प्रा. कु. प्रिती बी. इंगळे (वाकपांजर) | १५१-१५५ |
| ३८ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी सांगितलेले समाजव्यवस्थेचे अर्थव्यवहारावर परिणाम<br>प्रा.विनायक दशरथ नाकतोडे | १५६-१५८ |





Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

# ३४. राष्ट्रसंतांचे युवकांना आवाहन

प्रा. डॉ. हरिश्चंद्र माधवराव कामडी
आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय, देसाईगंज (वडसा), जि. गडचिरोली.

**प्रस्तावना**

भारत देश खेडयांचा देश आहे. आपल्या देशातील आजही चौसष्ट प्रतिशत जनता ग्रामीण भागातच वस्ती करून राहत आहे व शेती हाच त्यांचा उदरनिर्वाहाचा मुख्य धंदा आहे. त्यामूळे या देशातील 7 लाख खेडयांचा विकास झाला तरच खेडयाचा विकास झाला अशी धारणा आहे. या धारणेत निश्चितच तथ्यांश आहे. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात ग्रामीण लोकजीवन आणि शहरी लोकजीवन यात मोठी तफावत आहे. ही वास्तविकता या देशातील थोर विचारवंतांनी लोकांसमोर अनेकदा मांडलेली आहे.

विसाव्या शतकाच्या तिसऱ्या व चौथ्या दशकात महात्मा गांधी यांनी ग्रामीण जीवनात प्रगतीशील परिवर्तन व्हावे यासाठी ग्रामोद्यागाकडे ब्रिटिश शासन व जनतेचे लक्ष वेधले. त्यासाठी काही महत्वाचे प्रयोग केले. प्रात्यक्षिकेही आपल्या आश्रमात करून दाखविली.राष्ट्रसंतांनी ग्रामिण जीवन पाहिले आणि जगले. त्यांनीही काही प्रयोग केलेत, प्रात्याक्षिके करून दाखविली.

तुकडोजींचा जन्म यावली या मागासलेल्या खेडयात अठरा विश्वे द्रारिद्र असलेल्या एका इंगळे कुटूंबात झाला होता. राष्ट्रसंतजी हे ब्रम्हचारी होते, संत होते. राष्ट्रसंतजी हे प्रायमरी चौथाच वर्ग शिकलेले होते. राष्ट्रसंताचे संपूर्ण जीवन ग्रामीण भागातच गेले होते. तुकडोजीने स्वातंत्र लढयात भाग घेतला असला तरी ते नेते नव्हे तर क्रांतीसंत होते. राष्ट्रसंतानी आदर्श ग्रामची रचना प्रत्यक्षात करून दाखविली त्यासाठी 'ग्रामगीता' हा युगग्रंथ भविष्यात मार्गदर्शन करण्यासाठी लिहून ठेवला नव्हे 'ग्रामगीता माझे हृदय' असे सांगून स्वतःची अमर प्रतिमाच जगासमोर ठेवली. ग्रामीण जनतेची दशा पाहून त्यांच्या डोळयात अश्रू उभे राहात होते.

ग्रामाच्या विकासासाठी अन् ग्रामस्थांच्या उन्नतीसाठी वं. राष्ट्रसंतांनी जीवनभर कष्ट घेतले, जनजागरण केले. ग्रामनाथांची दशा पाहून त्यांच्या डोळयात पाणि येत असे. ग्राम सुखी होईल तरच देश सुखी होईल ही राष्ट्रसंतांची धारणा होती. जेव्हा जेव्हा शेतकऱ्यांना सुखाचे दिवस येते तेव्हा तेव्हा वं. महाराज अतिशय आनंदित होत असत ते मोठया आवाजात खंजिरीच्या धूनमध्ये गात....

राष्ट्रसंताच्या प्रत्येक भजनात, श्लोकात, बखरेत, ओवीत, भाषणात, लेखात मानवतेच्या संदेशासोबत ग्रामविकासाचे सुत्र आहे. त्यांच्या ग्रामविकासाच्या दृष्टीने शासनाचे कृषी विकास धोरण प्रत्यक्ष सार्वजनीक जीवनात आले तर भारत कृषी क्षेत्रात निश्चितच स्वावलंबी होईल यात शंका नाही.

या जगात भौतिक प्रगती करण्यासाठी विकसीत देशातील लोक सतत अग्रेसर आहेत. विज्ञानाच्या मूलभूत संशोधनाच्या आधारे प्रगती करीत आहेत. अमेरिका अन् युरोप खंडातील देश इतर देशाच्या मानाने पुढे आहेत. औद्योगिक क्रांती केल्यामुळे जपानसारखे देशही आघाडीवर आहेत. चीन देशाने गेल्या 30 वर्षात बरीच आर्थिक प्रगती केलेली आहे. या देशातील लोकांचे जीवन काटेकोर आहे. वेळेचा अन् धनाचा उपयोग उत्पादनासाठी करण्याचे तंत्र



PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

त्यांनी विकसित केल्यामुळे इतर विकसनशील व अविकसित देशातील कच्चा माल आपल्याकडे अतिशय कमी किंमतीत मिळवून पक्का होताच पुन्हा तेथेच विकत आहेत. आमचा देश विकसनशील जरी असला तरीविकसित देशाच्या मानाने आर्थिक दृष्टया मागेच आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी सारख्या महापुरूषांनी 60 वर्षापूर्वी ओळखले होते म्हणूनच त्यांनी आदर्श ग्रामाची संकल्पना प्रत्यक्षात उतरविली होती. त्याचसाठी त्यांनी 'ग्रामगीता' ग्रंथ लिहिला आणि लोकजागृती करतांना 'ग्रामराज्याची रामराज्य । स्वावलंबन हेचि स्वराज्य' अशी घोषणा केली होती. भारत मातेचा प्रत्येक सुपूत्र सर्व दृष्टीने बलवान, कष्टीक व्हावा हे त्यांचे स्वप्न होते. स्वप्न साकार करण्यापूर्वी 'आम्ही गरीब का आहोत ?' याची उत्कृष्ठ कारणमिमांसा त्यांनी केलेली आहे. त्याचे वाचन आणि चिंतन करणे आजच्या काळात अत्यावश्यक आहे.

श्रमिकांच्या परिश्रमातून प्रतिसृष्टी निर्माण करण्याची शक्ती आहे. श्रमीकांनीच मोठमोठी महाले बांधले, किल्ले बांधले, पुल बांधले, सडका बांधल्या, शेतीत नांगर चालविला वखर चालविला, ही सारी संपत्ती श्रमिकांच्या रक्ताने निर्माण झालेली आहे असेच तुकडोजीचे मत आहे. धन हे गरीबांचे रक्त आहे याची जाणीव श्रीमंतांनी ठेवलीच पाहिजे पण तसे झालेले नाही. राष्ट्रसंत अगदी स्पष्ट शब्दात एका लेखात लिहितात – 'श्रमशक्तीची बेकिंमत केल्यामूळेच आज भारत दुःखदैनाचे आगर बनले आहे. ताजमहालासारख्या सुंदर इमारती बांधणारे मजूर, सारे शहर स्वच्छ करणारे भंगी, यांची राहती घरे पांच मिनिट विसावा घेण्याच्या सुध्दा लायकीची नाहीत आणि त्या डुक्कर खोपडयांतच त्यांना उभा जन्म घालवावा लागतो. सर्वत्र उकिरडे, घाण, मोऱ्या, बेढब रस्ते हेच त्यांच्या नशीबी आहेत. राष्ट्रसंतांनी हे श्रमिक घराचे शब्दचित्र स्वतःच्या अनुभवातून रेखाटले आहे. त्यांनी स्वतः सात दिवस भंगी वस्तीत भंग्यांचे घरी राहून हे सारे प्रत्यक्ष अनुभवले होते, हे त्यांच्या जीवनचरित्रावरून दिसून येते. श्रमिकांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळाला असता तर त्यांचे प्राबल्य देशात राहिले असते. पण राष्ट्रसंतांना त्यांचे प्राबल्य दिसले नाही आणि त्यांचा सन्मान कोणत्याही सत्पुरूषाला भविष्यातही ते दिसणे कठीण आहे.

स्वराज्यप्राप्तीनंतर बलिदान बंदी, यात्राशुध्दी, मंदीरप्रवेश, समाजशिक्षण, आखाडा–संघटन, रझाकारांच्या प्रतिकारार्थ शक्तिसंवर्धन, व्यसननिर्मूलन, संतसम्मेलने, भुदानयज्ञ, भारतसेवा, समाज कार्य, गांधी स्मृति दिनानिमित्य आदर्श ग्राम निर्माण, 2500 व्या बुध्दजयंती निमित्य 1 कोटी तासांचा समयदान संकल्प आणि अखिल भारतीय साधू संघटनेचे उपक्रम या बाबत महत्वपूर्ण कार्य तुकडोजींनी केली. म. गांधी, साने गुरूजी, पं. मदनमोहन मालविय यांचेबरोबरच राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद, पं. जवाहरलालजी, आचार्य कृपलानी, आचार्य विनोबाजी, गुलजारीलाल नंदा, जयप्रकाश नारायण आदि थोर नेत्यांच्या संपर्कात आले असता तुकडोजींनी त्यांना प्रज्ञाप्रतिभाने प्रभावित केले. राष्ट्रपती भवनातील एका भजन प्रसंगी राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसादांनी त्यांना उत्स्फूर्तपणे 'राष्ट्रसंत' पदवी बहाल केली. त्याप्रसंगी महावीर त्यागी सारखे शासन –प्रशासनातील अधिकरी यांचे सोबतच पं. जवाहरलाल नेहरू देखील उपस्थित झाले होते.

राष्ट्रसंतांचे तरूणांना आवाहन

तथागत गौतम बुध्दांनी आपल्या अनुयायांना सागितले होते की, स्वतः स्वयंप्रकाशित व्हा. स्वतःचे दिवे स्वतः व्हा. त्याच प्रमाणे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी सुध्दा हेच सांगितले की, विचारवंत व्हा, शक्तीशाली व्हा, स्वावलंबी



PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist - Gadchiroli

व्हा, शीलवान व्हा, कर्तुत्ववान व्हा, गुणवान व्हा, बलशाली व्हा, म्हणजे लक्ष्मी तुमच्या दारी पाणी भरेल. राष्ट्रसंत युवकाना, स्त्री–पुरूषांना व गावकऱ्यांना सांगतात,

''आपआपले कार्य सांभाळावे । अजिवनमात्रासी संतुष्ट करावे ।
कोणीच कोणवरि न राहावे । अविसंबोनि ।।''107 ।। अ 4

तरूण हा आपल्या देशाचा कणा आहे. आपल्या देशाचे भवितव्य हे आपल्या देशातील तरूणांवर अवलंबुन आहे. तरूणांनी दुरदृष्टी ठेवुन सावधपणाने व प्रामाणिकपणे वागले पाहिजे. प्रत्येक कार्यात तरूण हा अग्रसेर असला पाहिजे. कोणतेही कार्य हातात घेण्यापुर्वी विचार केला पाहिजे. दुरदृष्टी ठेवुन सखोलपणे विचार करून कोणतेही काम करावे.

''त्यात नेहमी सावध असावे ।जे जे करणे असले बरवे ।
ते दूरदृष्टीने शोधुनि पाहावे ।तेव्हा हाती घ्यावे कार्य ।।'' 109।।अ. 6

राष्ट्रसंत युवकांना व्यसनाधिन न होण्याचे आवाहन करतात. दारू, गांजा, सिगारेट, तंबाखु, विडया, घुटका इ. मादक पदार्थाच्या आहारी न जाण्याचा सल्ला देतात. मादक पदार्थ्यांच्या सेवनाने केवळ द्रव्याचीच हाणी होते असे नाही तर शरीराची सुध्दा हाणी होते. घरातील मोठी मंडळी व्यसनाधिन असली कि, लहान, कोवळया मुलांवर तेच वाईट संस्कार होतात. राष्ट्रसंत देशातील युवकांना आवाहन करतात की, त्यांनी व्यसनाधिन होवु नये.

काही तरूण प्रतिष्ठा म्हणुन पानठेल्यावर अत्यंत महागडया सिगारेट ओढतात. काही तरूण डोक्यावरचा ताण कमी करण्यासाठी सिगारेट ओढतात, दारू पितात. राष्ट्रसंत म्हणतात कोणी सहज म्हणुन जरी विष पिला असेल तर त्याला मृत्यु येणारच. सापाला चोरून दुध पाजले तरी त्याच्या चाव्याने माणसाचा मृत्यु होणारच. त्याच प्रमाणे व्यसने सगळी वाईटच असतात. जरी त्याचा औषधाप्रमाणे उपयोग केला तरी सुध्दा त्याची वाईट सवय लागुन ते माणसाला हाणीकारकच ठरते. म्हणुन माणसाने व्यसनापासुन दुर असले पाहिजे असा सल्ला राष्ट्रसंत देतात. राष्ट्रसंत गावातील प्रतिष्ठीत नागरिक, आई–वडिल, पालक, शिक्षकांना मुलांकडे लक्ष देण्याची विनंती करतात.

''कोठेही मुलांना लहानपणी ।व्यसने लागू न द्यावी कोणी ।
लागल्याची घ्यावी झाडणी ।शिक्षक–पालकांनी ।।''52 ।। अ.19

काही तरूण चोऱ्या करतात. गुंडागिरी करतात. चोरटयांना व गुडागिरी करणाऱ्यांना पोलीस पकडुन नेतात. काही दिवसानंतर त्यांना सोडुन दिले जाते. परत पोलसातुन सुटल्यानंतर आणखी चोऱ्या करतात. कारण चोऱ्या करणे व पोलीसांचा मार खाणे याशिवाय त्यांना पर्याय नसतो. कारण त्यांनी लोकांचा विश्वास व स्वतःचा आत्मविश्वास गमावलेला असतो. कोणी त्यांना काम देण्यासाठी तयार नसतात. अशा तरूनांना मार्गदर्शन करण्याचे काम गावातील प्रतिष्ठीत नगरिकांनी व ज्ञानवंत व्यक्तींनी करावे.

''जे जे आपणासी कळते ।ते ते सांगावे सकळाते ।
आपुलेचि म्हणोनि जन ते ।मायबाप ।।''64 ।। अ.1

राष्ट्रसंतांच्या उपदेशातून, कार्यातून, लिखाणातून युवकांबद्दल तळमळ व राष्ट्रविकासाची दृष्टी दिसून येते. त्यांचा हा दृष्टीकोन आजही आपल्या सर्वांसाठी अतिशय मोलाचा आहे. प्रयोग आणि प्रात्याक्षिकातून उतरविण्याजोगा



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

आहे, असे प्रकर्षाने म्हणावेसे वाटते. राष्ट्रसंतांनी आपल्या ग्रामगीतेच्या माध्यमातून जे लिखाण केले आहे त्याचे करण्याची, समजून घेण्याची आपल्या देशातील नागरिकांची नितांत गरज निर्माण झाली आहे.

संदर्भ ग्रंथ सुचि

१. संपादक सुदामजी सावरकर – ''सार्थ ग्रामगीता'' भु–वैकुंठ आत्मानुसधान टेकळी( अडयाळ )
२. प्रा. रघुनाथ कडवे – राष्ट्रसंताच्या ग्रामगीतेची वैज्ञानिक दृष्टी, राष्ट्रसंत तुकडोजीची ग्रामविकास दृष्टी, ग्रामगीतेची आर्थिक दृष्टी–श्रम तिथे श्रीमंती, मानवतेचे महापुजारी राष्ट्रसंत तुकडोजी
३. मोहोड बाबा – ''राष्ट्रसंतांची प्रवचने''
४. वाघ जयकुमार –''गावागावासी जागवा''
५. चंद्रशेखर नामदेव गणविर–''आदर्श जन हितचिंतक:तुकडोजी महाराज''

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

## CATEGORY - III

## RESEARCH, PUBLICATIONS & ACADEMIC CONTRIBUTIONS

### (A) RESEARCH PAPER/ARTICLE PUBLISHED IN JOURNALS

**( i ) Published Papers in Refereed/Non-Refereed Journals :**

| Sr. No. | Title of Paper with Page No. | Name of Journal | ISSN/ISBN No. | Whether peer reviewed. Impact factor, if any | No. of Co-authors | Whether you are the main author | API Score Claimed | Annexure No. of Proof Enclosed |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Challenges to Youth of Rastrasant Tukdoji Maharaj page no. 141-144 | Ajanta | 2277-5730 | yes 6.399 VGC carelisted | nil | yes | 25 | 31 |
| 2 | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | |
| 4 | | | | | | | | |
| | | | | | | | 25 | |

### (B) PUBLICATION OF BOOKS/ CHAPTERS IN BOOKS

**(i) Text/Reference Books published :**

| Sr. No. | Title of Book | Name and Address of the Publisher & Year of Publication | ISSN/ISBN No. | Level of Publication: International /National | No. of Co-authors | Whether you are the main author | API Score Claimed | Annexure No. of Proof Enclosed |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | |
| 4 | | | | | | | | |
| 5 | | | | | | | | |
| 6 | | | | | | | | |

**(ii) Articles/Chapters published in Books:**

Adarsh Arts & Commerce College Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

Dr H M Kamdi

Faculty Participation in Seminar/ Conference/Workshop 2019-20

| Seminar/Workshop/ Conference | International Level | National Level | State Level | Uni. Level |
|---|---|---|---|---|
| Seminar | | 1 | | |
| Workshop | | 1 | | 1 |

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

# DR. BABASAHEB AMBEDKAR

## GONDWANA UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION, CHANDRAPUR, MAHARASHTRA, INDIA



## One Day National Seminar On

## NEW NATIONAL EDUCATION POLICY-2019

### Organised on 1st September 2019

# Certificate

This is to certify that Mr./Ms./Mrs./Dr./Prof. Dr H. M. Kamdi

working as Asso. Professor at Adarsh Arts & Com. College Desaiganj

has attended the One Day National Seminar on "**New National Education Policy-2019**", organised by Dr. Babasaheb Ambedkar Gondwana University Teachers' Association Chandrapur, at Sardar Patel Mahavidyalaya, Chandrapur, Maharashtra, India

He/She has published/presented research paper entitled ______

______

| | | |
|---|---|---|
| Prof. Sudhakar Petkar | Dr. Pramod Shambharkar | Dr. Esadas Bhadke |
| President | Organising Secretary | Convener |

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist. Gadchiroli



# CERTIFICATE

## OF ATTENDANCE

AUROPATH

A JOURNEY TOWARDS EXCELLENCE

4th January 2020

This is to certify that

Dr./Mr./~~Mrs.~~/Miss. H. M. Kamdi.

has successfully attended and actively participated in the One day National Experiential Workshop on

**"INTEGRATING COURSE OBJECTIVE AND COURSE OUTCOME IN PRESENT CURRICULUM AND LATEST TRENDS & ROLE OF LIBRARY IN TEACHING METHODOLOGY"**

Held jointly with
IQAC of Vivekanand Mahavidyalaya, Bhadrawati,
Dist. - Chandrapur, Maharashtra.

| Dr. N. G. Umate | Dr. S. M. Ghosh | Mr. Mohit B. Sawe |
|---|---|---|
| Principal | Director, Auropath | IQAC Co-ordinator |
| Vivekanand Mahavidyalaya | Sri Aurobindo Society | Vivekanand Mahavidyalaya |
| Bhadrawati. | Puducherry | Bhadrawati. |

Adarsh Arts & Commerce College, Desaiganj

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

# Gondwana University, Gadchiroli (M.S.)

NAAC Sponsored

# One Day Awareness Workshop

on

## "NAAC Revised Accreditation Framework"

# Certificate

This is to certify that Prof./Dr./Mr./Mrs./Miss. HARISHCHANDRA MADHAORAV KAMDI

of ADARSH ARTS AND COMMERCE COLLEGE, WADSA. has participated in the NAAC Sponsored one day Awareness Workshop on "NAAC Revised Accreditation Framework", organised by Internal Quality Assurance Cell (IQAC) of Gondwana University, Gadchiroli on 28th January, 2020.

Dr. Dhanraj A. Patil
IQAC Co-ordinator
Gondwana University, Gadchiroli

Dr. Ishwar S. Mohurley
Registrar
Gondwana University, Gadchiroli

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College
Desaiganj (Wadsa) Dist. Gadchiroli

Dr. N. V. Kalyankar
Vice Chancellor
Gondwana University, Gadchiroli